**आकाशवाणी पुणे**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक – 02/06/२2024** **वार – रविवार**

---

**कल्याणीनगर अपघात**

कल्याणी नगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीचे आई वडील शिवानी अगरवाल आणि विशाल अगरवाल यांना न्यायालयाने ५ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. रक्ताच्या नमुन्यात फेरफार करून पुराव्यांमध्ये छेडछाड केल्याप्रकरणी शिवानी अगरवालला तर पोलीस कामात अडथळा आणला म्हणून विशाल अगरवाल याला अटक केली आहे असं पोलीस सहाय्यक आयुक्त सुनील तांबे यांनी सांगितलं.

**आरटीओ**

या अपघात प्रकरणानंतर पुणे प्रादेशिक परिवहन विभागानं सुरू केलेल्या तपासणी मोहिमेत मागील दहा दिवसांत ११ विनानोंदणी वाहने आढळली तर मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या 52 जणांवर कारवाई करण्यात आली. मद्यपान संदर्भातील सर्व खटले तसेच अल्पवयीन चालकांची प्रकरणे न्यायालयात पाठवली जाणार असून वाहन नोंदणी नसलेल्या प्रकरणांमध्ये संबंधित विक्रेत्याचे व्यवसाय प्रमाणपत्र निलंबित करण्यासाठी नोटिसा बजावण्यात येणार आहेत अशी माहिती प्रभारी पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी दिली.

**दप्रॉब्लमऑफरूपी**

मराठी अर्थशास्त्र परिषद महाराष्ट्र आणि सायास सहकारी संस्था यांच्या वतीनं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या 'द प्रॉब्लम ऑफ रूपी' या प्रबंधाच्या शंभरी निमित्त लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स इथं 11 जून रोजी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या शंभर वर्षातील आर्थिक प्रश्नांचा इतिहास वर्तमान आणि भूगोल यावर भाष्य करून पुढील शंभर वर्षाकरिता विचार करण्याच्या उद्देशानं या परिषदेचे आयोजन करण्यात आलं आहे.

**विश्वबंधुता**

"जाती-धर्माच्या भिंती भेदून बंधुत्वाचा धागा विणत 'मानव तितुका एकची आहे' असा मानवतावादी आणि बंधुभावाचा विचार देणारा आपला भारत देश आहे," असं मत पहिल्या विश्वबंधुता काव्यमहोत्सवाच्या अध्यक्षा, गझलकार मीना शिंदे यांनी व्यक्त केलं. पहिल्या विश्वबंधुता काव्य महोत्सवाचे उद्घाटन पुण्यात पत्रकार भवनात मीना शिंदे आणि साहित्यिक शंकर आथरे यांच्या हस्ते नुकतंच झालं त्या वेळी त्या बोलत होत्या.

**नीलेशकेकाण-**

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पुणे विभागाच्या अध्यक्षपदी नीलेश केकाण यांची निवड झाली आहे. मावळते अध्यक्ष नागेश भागणे यांच्याकडून त्यांनी कार्यभार स्वीकारला. उपाध्यक्षपदी श्रीकांत इप्पलपल्ली, सचिवपदी राहुल चिंचोलकर, तर खजिनदारपदी हिमांशू दवे यांची निवड झाली आहे. २०२४-२५ या वर्षाकरिता नव्या कार्यकारिणीसाठी ही निवड करण्यात आली आहे.

**पुणे ग्राडाकविभाग**

पुणे ग्रामीण टपाल विभागाच्या वतीनं काल कोरेगाव पार्क इथल्या डॉक्टर मौलाना अब्दुल कलाम आझाद मेमोरियल हॉल मध्ये पुणे टपाल क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या सर्व टपाल विभागातील कर्मचारी आणि त्यांच्या पाल्यांकरता विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्पर्धा

आयोजित करण्यात आल्या होत्या. यामधून  निवड झालेल्यांना महाराष्ट्र राज्य पातळीवर  होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये पाठविण्यात येणार आहे अशी माहिती पुणे ग्रामीण विभागाच्या टपाल विभागाचे अधीक्षक बाळकृष्ण एरंडे यांनी दिली.

**सत्कार**

आर्थिक वर्ष २०२३-२४ या वर्षामध्ये पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेच्या करआकारणी आणि  करसंकलन विभागातील करसंकलनामध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या  २३ कर्मचाऱ्यांचा आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी करसंकलन विभागाने करसंकलनासाठी घेतलेला पुढाकार आणि उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.

**शाहीरी निनाद**

शाहीरी निनाद या वार्षिक नियतकालिकाच्या, शाहीर महर्षि आत्माराम पाटील विशेषांकाचं  प्रकाशन काल झालं. शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने पुण्यात गेले दिड महिना सुरु असलेल्या मोफत पोवाडा प्रशिक्षण वर्गाचा समारोप आणि शाहीर हिंगे यांच्या साथीदाराच्या सन्मान समारंभात हे प्रकाशन करण्यात आलं. पोवाडा प्रशिक्षण हे कला संवर्धनासह संस्कार रुजवण आहे, असे गौरवोद्गार खासदार मेधा कुलकर्णी यांनी यावेळी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

**बाजार समिती**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रसह विविध राज्यातून 90 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने फळभाज्यांचे भाव वधारले आहेत. उन्हाचा कडाका आणि अवकाळी पावसामुळे पालेभाज्यांवर डाग पडल्याने भाज्यांची प्रतवारी खालावली आहे त्यामुळे चांगल्या प्रतीच्या भाज्यांचे भाव  कडाडले आहेत. फुल बाजारात आवक आणि मागणी स्थिर असल्याने भाव टिकून आहेत.

**हवामान**

पुण्यात आज दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ झालं. कमाल तापमान 37 अंश तर किमान तापमान 25 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सियसची नोंद झाली; उद्या शहरात हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**